ज्ञानगंगा घरोघरी
सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त
**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**
(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)
(महाराष्ट्र शासनाने स्थापिलेले)
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक- ४२२२२२
**दूरध्वनी :** कार्यालय (०२५३) २२३११०६, २२३०११८, २२३०७१४, २२३०७१५ **ई-मेल** : dir_ssd@ycmou.digitaluniversity.ac
**विद्यार्थी सेवा विभाग**

जावक क्र. यचममुवि/वि.से.वि./२०२३/ 185/09 दिनांक- २९.०८.२०२३

प्रति,
मा.विभागीय संचालक/मा.वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार,
विभागीय केंद्र – अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, कोल्हापूर, नांदेड

विषय – संपर्कसत्र वेळापत्रकाबाबत ...

विद्यापीठ राबवित असलेल्या विविध शिक्षणक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची प्रवेश प्रक्रिया दिनांक १ जुलै २०२३ पासून सुरु आहे. दिनांक ३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे सत्रनिहाय व वर्षेनिहाय(प्रथम/द्वितीय/तृतीय) संपर्कसत्रांचे आयोजन दिनांक १ सप्टेंबर २०२३ पासून अभ्यासकेंद्राने करावयाचे आहे. सर्व अभ्यासकेंद्रांनी शिक्षणक्रमनिहाय/सत्रनिहाय संपर्कसत्रांचे वेळापत्रक तयार करावे. सदरचे वेळापत्रक अभ्यासकेंद्राच्या सूचनाफलकावर लावण्यात यावे. सत्रनिहाय (Semester Pattern) शिक्षणक्रमाच्या प्रथम, द्वितीय व तृतीय सत्राचे संपर्कसत्राचे वेळापत्रक सप्टेंबर २०२३ ते डिसेंबर २०२३ या चार महिन्यांच्या कालावधीसाठीचे असावे, तर वार्षिक शिक्षणक्रमांच्या (Annual Pattern) संपर्कसत्राचा कालावधी हा सप्टेंबर २०२३ ते एप्रिल २०२४ असा असावा.

अभ्यासकेंद्राने संपर्कसत्राचे वेळापत्रक हे महाविद्यालयाच्या वेबसाईटवर जेथे मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्राची माहिती दाखवलेली आहे, तेथे शैक्षणिक वर्षे २०२३-२४ चे शिक्षणक्रमनिहाय संपर्कसत्राचे वेळापत्रक टाकण्यात यावे. वेळापत्रकाची एक प्रत विद्यार्थी सेवा विभागास व संबंधित विभागीय केंद्रास देण्याबाबत सांगण्यात यावे. तरी आपल्या विभागीय केंद्रांतर्गत अधिनस्त अभ्यासकेंद्रांना याबाबत कळवावे.

य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
ज्ञानगंगा घरोघरी
विद्यार्थी सेवा विभाग

संचालक,
विद्यार्थी सेवा विभाग

प्रत माहितीसाठी – (१) मा.कुलगुरु कार्यालय
(२) मा.कुलसचिव कार्यालय
(३) मा.परीक्षा नियंत्रक
(४) वित्त अधिकारी
(५) प्रमुख भांडार कक्ष